# दुर्ग चावंड व हडसर

आमच्या मनात दुर्लक्षित, उपेक्षित असे गड़ बघण्याचा विचार होता। या दृष्टिने internet वरुन माहिती मिळवायला सुरुवात केली तसेच नुकतेच प्रकाशित झालेले सतीश अक्कलकोट यांचे 'दुर्ग' पुस्तक वाचले। यातुन जुन्नर तालुक्यातल्या चांवड, हडसर, जीवधन या दुर्गांची माहिती मिळाली व जुन्नर तालुका कवर करण्याचे ठरविले। सिंहगड़, राजगड़ वगैरे किल्ले तर लोकाना माहित आहेत, पण या उपेक्षित गड़ाकडे कोणी लक्ष देत नाही। असो, आम्ही आमच्या पासुन सुरुवात करायचे ठरविले।

चांवड : नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी (१ जानेवारी २००६) मी व भालचंद्र घरचांच्या विरोधाला न जुमानता boxer गाडीवर जुन्नर 'गाडीक्रांत' करण्यासाठी भल्यापहाटे कुडकुडत निघालो। नेहमीप्रमाणे भाल्याने मला गाडी चालवायला सांगितली व माझ्या देहाआड़ लपला आणि थंडीपासुन स्वतःचे रक्षण केले। जताना १-२ ठिकाणी थांबुन आम्ही सूर्योदय, पाण्यावरचे धुके यांचे digicam मधून फ़ोटो काढले। भन्नाट वेगाने गाडी चालवत (ज्याबद्दल घरचांच्या नंतर शिव्या खाल्ल्या) पहिला stop नारायणगावात घेतला। चहा पिला व जुन्नरकडे प्रयाण सुरु ठेवले। मध्येच रस्ता चुकला पण नंतर बरोबर रस्त्याला लागलो। जुन्नर मध्ये नाश्ता केला। मुगलांच्या काळात जुन्नर ही प्रमुख बाजारपेठ होती।

९ च्या सुमारास चांवड गावात पोचलो। तिथल्या शाळेतल्या पटांगणात गाडी लावली, पाणी भरले व गड चढायला सुरुवात केली (गड़ाने आमच्यावर चढायला सुरुवात केली)। भरपुर रानफ़ुलं होती। सावकाश पाना-फ़ुलांचे निरीक्षण-परीक्षण करत, फ़ोटो काढत वर जात होतो। गड़ चढायला अर्धा तास लागला। आधारासाठी लोखंडी गज़ लावले आहेत (काही ठिकाणी ते तुटले आहेत, त्यामुळे सावकाश जावे)।

गड़ाच्या प्रवेशद्वारावर गणेशमूर्ती कोरलेली आहे। पूर्ण गडावर ऊँच गवत आहे (वाळलेले) ज्यामुळे गड़ाला सोनेरी झळाळी लाभली आहे। गड़ावर पाणाच्या ७ टाक्या आहेत पण पाणी खराब आहे। एक भग्न मंदीर आहे, त्यात गणपती, शिवलिंग आहेत। मंदीराची कमान नक्षीदार आहे। आम्ही इथे video shooting केले। वरती अजुन एक देवीचे मंदीर आहे। आजुबाजुला भग्न अवशेष पडलेले आहेत। देवळाच्या सावलीत बसून आम्ही जेवण केले व भरपूर फ़ोटोग्राफ़ी केली। चावंड गड़ावरुन हडसर, निमगिरी गड़ दिसतात, माणिकडोहाचा विस्तृत जलाशय दिसतो। उतरण्यापूर्वी आम्ही व पु काळे, ग्रेस, पु ल यांच्या साहित्यचे संवाद म्हणत, अभिनय करत शूटिंग केले। ते अतिशय मस्त झाले।

नंतर आम्ही जवळच्या पूर गावात गेलो। तिथे प्राचीन कुकडेश्वराचे मंदीर आहे। मंदीराचे शिल्पकाम अतिशय कोरीव आहे। सध्या त्याचा जीर्णोद्धार सुरु आहे, त्यामुळे मंदीरातले देव शेजारच्या घरात ठेवलेले आहेत। संत तुकाराम महाराजांचा पुतळा आहे। अतिशय सुंदर ठिकाण पण उपेक्षित।

**चावंडचा संक्षिप्त इतिहासः-**

या दुर्गाची निर्मिती १४०० सालात झाली ( बहामनी सत्तेच्या काळात)। नंतर ह दुर्ग निजामशाहीकडे गेला। १६३६ मध्ये शहाजीराजांनी हा मुगलांना दिला। १६९५ सालात मराठ्यांनी हा गड़ जिंकला। पुन्हा मुगलांनी हा जिंकला १७०४ मध्ये; तेव्हा किल्लेदार होता शामराव कछवा। पुन्हा १७५७ मध्ये मराठ्यांनी ह्यावर भगवा फ़ड़कावला। १८१८ मध्ये इंग्रजानी तोफ़ाचा भडिमार करुन हा जिंकला।


**चांवडचा भूगोलः-**

प्रकार- गिरीदुर्ग
ऊँची- समुद्रसपाटी पासुन ३४९५ फ़ूट
तालुका- जुन्नर , जिल्हा- पुणे
अंतरः पुणे-जुन्नर ९० km, जुन्नर-हडसर १५ km

## हडसर

चावंड ट्रेक झाल्यावर आमचे मन इतर गड़ाकडे धावत होतं। शेवटी २ महीन्यांनी योग जुळुन आला व १२ मार्च २००६ रविवारी पहाटे मी, भाल्या, सुकुमार, चिन्मय, उर्जीश (पृथ्वीचा नवरा) असे ५ जण ३ गाड्यांवर जुन्नर कडे निघालो। नारायणगावात नाष्टा केला, फ़ळ घेतली। मग जुन्नरला न थांबता थेट हडसर गावात पोचलो १०.३० ला। जाताना लोकांना पत्ता विचारला पण ते ड़दृदढद्वझड्ढ झाले यावरुन हा गड़ किती दुर्लक्षित आहे हे लक्षात येते।

हडसर १२०० वस्तीचे गाव आहे। गावातल्या कूपनलीकेतुन पाणी भरून घेतले। पाण्याची चव तुरट होती व रंग पिवळसर होता। एका सद्‌गृहस्थाच्या अंगणात गाड्या लावल्या व गड़ाकडे निघालो। शेताच्या बाधांवरुन चालत, फ़ुलांचे फ़ोटोसेशन करत पायथ्याला पोचलो पण गड़ाकडे जायची वाट काही सापडेना। आमची स्थिती खालील चित्रात दिलेली आहेः




शेवटी अवघड़ वाटेवरुन चढायला सुरुवात केली। बरीच हाडुके पसरली होती। दगड़ सैल होते त्यामुळे पाय घसरत होते तरी आम्ही डगमगलो नाही व चढाई चालू ठेवली। ११/२ तासाच्या तपश्चर्येनंतर गड़ सर केला। वरती पोचल्यावर दुस-याबाजूने येणा-या पाय-या दिसल्या। गड़ाचा दरवाजा संपूर्ण कातळात खोदलेला आहे....पुन्हा कातळामध्ये खोदलेल्या पाय-या व पुन्हा दरवाजा...पुन्हा कोरलेल्या पाय-या चढलो व हडसर गड़ावर प्रवेश केला। वर पाण्याच्या टाक्या आहेत पण पाणी चांगले नाही। गड़ावर बरीच जनावर भटकत होती। गड़ावर हडेश्वराचे मंदीर आहे। आत शिवलिंग, मारूती, गणपती आहेत। आजुबाजुला बरीच निलगीरीची झाड़ लावलेली आहेत, त्यामुळे थोडीफ़ार सावली आहे। वरुन शिवनेरी, चावंड, जीवधन, निमगिरी गड़ दिसतात, माणिकडोहाचा विस्तृत जलाशय दिसतो।

गड़ावर यायला दुसरी पण वाट आहे। कातळत खोदलेल्या खोबण्या व खुटांच्या आधारे बुरुजापर्यंत ही वाट येते (या वाटेचा गावकरी उपयोग करतात)। इथे ३ गुहा आहेत ज्याचा आधी धान्य ठेवायला मराठे उपयोग करत। इथे दगडी रांजण पण आहे।

## चावंडचा संक्षिप्त इतिहासः-

या दुर्गाची निर्मिती सातवाहन काळात झाली।१६३७ मध्ये हा गड़ शहाजीराजांनी मुगलांना दिला। १६७० सालात शिवाजीराजांनी हा गड़ जिंकला। औरंगजेबानी ओक्टोबर १७०२ मध्ये हा जिंकला। पुढे निजामाकडून १७५७ मध्ये मराठ्यांकडे आला। १८१८ मध्ये इंग्रजानी तोफ़ाचा भडिमार करुन हा जिंकला।

## हडसरचा भूगोलः-

प्रकार- गिरीदुर्ग
ऊँची- समुद्रसपाटी पासुन ४६८७ फ़ूट
तालुका- जुन्नर , जिल्हा- पुणे
अंतरः पुणे-जुन्नर ९० त्त्७, जुन्नर-हडसर १४ त्त्७